# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ५३/२०१०/ दिनांक :

श्री. विलास दादासो साळुंखे,
मु.पो. शेड्याळ, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि., संवसु मंडळ कार्यालय,
विश्रामबाग , सांगली.
२) कार्यकारी अभियंता,
महावितरण, विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ,
जिल्हा सांगली.
३) सहाय्यक अभियंता,
महावितरण, उप विभाग, संख जि. सांगली — विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. विलास दादासो साळुंखे, रा. शेड्याळ, ता. जत, जि. सांगली या शेतकरी ग्राहकाने आपणांस वितरण कंपनीने दिलेले बील अवाजवी आहे म्हणून मान्य नाही, ५६ :२ नुसार कारवाई करु नये इ. मागणीसाठी दि. २.३.२०१० रोजी प्रतिनिधी मार्फत मंचामध्ये अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज दाखल करुन घेवून मंचाने वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला. तसेच मुद्देनिहाय अभिप्राय प्राप्त झाल्यावर दि. २०.४.२०१० रोजी मंच कार्यालयात सुनावणी घेण्याचे निश्चित केले व तसे उभयतांना नोटीसीने कळविले. सुनावणीच्यावेळी ग्राहकातर्फे प्रतिनिधी श्री. हरिभाऊ खापरे तसेच वि.प.चे प्रतिनिधी उपस्थित होते.

ग्राहकाने सदरचा अर्ज दाखल करतांना अंतरिम आदेशासाठीही अर्ज दाखल केला होता. त्याचीही सुनावणी अर्ज दाखल तारीख २.३.२०१० रोजी करुन अंतरिम आदेशान्वये थकबाकी वसुलीसाठी मंचाने तात्पुरती स्थगिती दिली. सदर ग्राहकाने ‘ क्ष ‘ नमुन्यात सांगली मंडल कार्यालय सांगली येथे अर्ज दाखल केलेला आहे, मात्र त्याचा निर्णय होण्यापूर्वीच, वीज पुरवठा थकबाकीसाठी खंडित केला जाईल अशी भिती वाटल्याने ग्राहकाने अंतरिम आदेशासाठी अर्ज केला व त्यास मंचाने वर नमूद केल्याप्रमाणे मंजुरी दिली.

‘ क्ष ‘ नमुन्यातील अर्जाच्या निर्णयानंतर आवश्यक असल्यास मूळ अर्ज चालवावा असे ठरले व त्याप्रमाणे दि. २०.४.२०१० रोजी सुनावणी घेतली.

ग्राहकाने दाखल केलेली अंतरिम आदेशासाठीची कागदपत्रे तसेच नव्याने दाखल केलेला अर्ज सोबतची कागदपत्रे वि.प.कडून दोन्हीही वेळेला सादर केलेले कागद व नोंदविलेले म्हणणे या आधारे तक्रारीचे स्वरुप व त्या मागील वि.प.ची भूमिका याचे स्वरुप सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे आहे.

<u>ग्राहकाच्या तक्रारीचे स्वरुप</u>

श्री. विलास दादासो साळुंखे, शेड्याळ, ता. जत यांचे ३ एचपीचे शेतीवापरासाठीचे कनेक्शन ९.५.१९९७ पासून चालू आहे. सदर ग्राहकाचा क्र. २७०२८०३६४०२६ (अेजी १३६) असा असून त्यांस येणारी बीले सप्टेंबर २००८ पर्यंत ग्राहक भरत होता असे ग्राहकातर्फे प्रतिनिधींनी नमूद केले आहे. तथापि १५.१०.२००७ रोजी वि.प.च्या वतीने सहाय्यक तारमार्ग तंत्री यांनी कृषी स्वाभीमान योजनेअंतर्गत कांही फॉर्म भरुन घेतले व आपण ३ अश्वशक्ती मंजुरीऐवजी ६ अश्वशक्ती भार वापरत असल्याने जादा वापर असलेल्या ३ एचपी भारासाठी दंड भरावा लागेल असे सांगितले. हे ग्राहकाला कळताच ग्राहकाने दिलेला अर्ज संबंधित कर्मचाऱ्याकडे परत मागितला त्याने तो अर्ज देण्यास नकार दिला व चाचणी अहवाल न दिल्याने सदरचा अर्ज आपोआपच रद्द होतो असे सांगितल्याचे ग्राहकाने आपल्या अर्जात नमूद केल्याचे दिसून येते. सप्टेंबर २००८ ला रु. ३६८८९.६५ इतक्या रकमेचे जादा बील आल्याने ग्राहकाने वीज तोडली जावू नये म्हणून प्रथमत: ‘ क्ष ‘ नमुन्यात कक्षाकडे व नंतर अंतरिम आदेशाद्वारे मंचात मागणी नोंदविलेली दिसून येते. सारासार ग्राहकाच्या म्हणण्यानुसार ३ अश्वशक्ती इतकाच भार ग्राहक वापरत असतांनाही दिलेले अवाजवी बील पूर्णपणे रद्द व्हावे व त्यासाठी विद्युत अधिनियम २००३ मधील ५६:२ नुसार कार्यवाही होवू नये, तसेच सदरचे बील पूर्णपणे रद्द व्हावे अशाप्रकारच्या मागणीचे सर्वसाधारण स्वरुप दिसून येते.

<u>वि.प.ची भूमिका व कार्यवाही</u>

सदरचा ग्राहक १९९७ पासून शेती ग्राहक असल्याचे वि.प.ने मान्य करुन प्रतिनिधीने दोन कागदावर घेतलेल्या सह्या कृ.स्वा. यो..अंतर्गत कामासाठीच्या होत्या व त्या कागदावर घेतल्या नसून संबंधित आवश्यक त्या फॉर्म भरुन घेतल्या आहेत व त्या संदर्भात माहे सप्टेंबर २००८ ची थकबाकी असे २१८५७/– रुपयांची बाकी असल्याने त्यांस ५६:२ प्रमाणे थकबाकी वसुलीसाठी नोटीस दिलेली आहे. तसेच ग्राहकाने ३ एचपी ऐवजी ६ एचपी इतका जादा वापर केलेला असल्याने ग्राहकाने त्या संबंधित होणारे बील व दंडाची रक्कम भरणे आवश्यक आहे विपने नमूद करुन वसुलीसाठी दिलेल्या नोटीसीचे समर्थन करुन सदरची थकबाकी व चालू बील भरण्याचा आदेश व्हावा अशी मंचाकडे मागणी केलेली आहे.

<u>कारणमिमांसा</u>

श्री. विलास दादासो साळुंखे, शेड्याळ, ता. जत हा शेती ग्राहक ३ एचपी इतका भार वापरत असल्याचा सप्टेंबर २००७ पर्यंतचा खुलासा वि.प.ने केला आहे व तो ग्राहकास मान्य आहे. तथापि डिसेंबर २००७ च्या दरम्यान ३ एचपी ऐवजी ६ एचपी इतका भार वाढविल्याचे वि.प.चे म्हणणे आहे व तसे वि.प.ने आपल्याकडील सीपीएलवर नोंदविले आहे.

वादातील रक्कम रु. ३३५८९/– ही सप्टेंबर २००८ च्या बिलामध्ये समाविष्ट करण्यात आली. ती करत असतांना स्वाभीमान योजना अंतर्गत वाढीव ३ एचपीसाठी तरतुदीप्रमाणे दंडात्मक कारवाई म्हणून व थकबाकी म्हणून प्रथमत: रु. २८८००/– अशी रक्कम मागणी स्वरुपात नोंदविली, मात्र सदर ग्राहकाने दोन अर्ज केलेले असल्याने एक अर्ज जून २००९ मध्ये रद्द करुन रु. २०२८०/– रुपयांचे बील अधिक थकबाकी अशी २१५५७ इतकी बाकी ग्राहकाकडून येणे असल्याचे वि.प.चे मत आहे, ते मंचास अयोग्य वाटते, कारण भार वाढविणे किंवा कमी करणे यासाठी चाचणी अहवालाची आवश्यकता व सक्ती असल्याने तसा चाचणी अहवाल ग्राहकाने दिला किंवा नाही या संबंधीने वि.प.ने खुलासा केलेला नाही. तसेच ३ ऐवजी ६ एचपी इतका भार नोंद असेल तर त्याचा तसा संयुक्त चाचणी अहवाल तयार करुन मंचापुढे सादर करणे आव. होते ते ही वि.प.ने केलेले नाही. आपल्या ९.३.२०१० च्या लेखी म्हणण्यामध्ये ढोबळमानाने आपले म्हणणे योग्य असल्याचा निर्वाळा देत कोणत्याही कागदपत्राची खातरजमा न करता अगर तसे मंचापुढे दाखल न करता दिलेले म्हणणे योग्य व नियमास अनुसरुन वाटत नाही. त्यामुळे सीपीएलवरील ३ ऐवजी ६ एचपी डिसेंबर २००७ पासूनची नोंद ग्राह्य धरणे उचित वाटत नाही. स्वाभीमान योजना अंतर्गत जे फॉर्म भरुन घेतले आहेत त्यामध्येसुध्दा नेमका अर्ज केव्हा भरुन घेतला याबद्दल शंकास्पद आहे, कारण कंपनीने परिशिष्ट अ १ हा फॉर्म भरुन घेतांना त्यावरील तारीख चुकीची नोंदविल्याचे दिसून येते. तथापि अनधिकृत वाढीव भाराचा अर्ज भरुन घेतांना दि. १५.१०.२००७ अशी तारीख नोंदविली आहे. कृषी स्वाभीमान योजना २००७ या योजनेअंतर्गत दि. २७.८.२००७ चे वि.प.चे ३३४७२ क्रमांकाचे परिपत्रक पहाता त्यातील १ ते १२ अटींची पूर्तता उभयतांनी करणे आवश्यक आहे व त्यानंतरच थकबाकी वसुलीसाठी ५६:२ ची कारवाई उचित होणार आहे. घाई गडबडीने केलेली कोणतीही कृती मंच दाखल करुन घेत नाही तसेच त्याची दखलही घेत नाही. त्यामुळे डिसेंबर २००७ पासून ३ एचपी इतकाच भार गृहीत धरुन तशा पध्दतीचे नवीन सुधारित बील ग्राहकास अदा करावे. डिसेंबर २००७ पासून त्या पुढील काळात दिलेली सर्व बीले रद्द करुन ३ एचपी प्रमाणे ग्राहकास बील अदा करावे त्यांस कुठल्याही प्रकारचा विलंब आकार अगर व्याज लावू नये असे मंच आदेश देत आहे. त्याचप्रमाणे डिसेंबर २००७ ते आज अखेर दिलेली सर्व बीले रद्द करावीत, थकबाकी वसुली संदर्भात दिलेला अंतरिम आदेश सदर आदेशामुळे रद्द करण्यात येत आहे.

सदरील तक्रार मांडत असतांना मंचापुढे येण्यापूर्वी ग्राहकाचे प्रतिनिधीनी माहिती अधिकारात बरीचशी माहिती वि.प.कडून मागविल्याचे दाखल कागदपत्रांवरुन दिसून येते. तसेच त्या आधी कांही प्रश्न वि.प.च्या प्रतिनिधींनी मंचास विचारले आहेत. सदरचा मंच ग्राहकाची गाऱ्हणी विनियमातील तरतुदीप्रमाणे न्याय निर्णय करण्यास बसलेला आहे, त्यांस वेगवेगळे विविध प्रश्न अर्जाद्वारे प्रतिनिधीनी विचारणे उचित नाही. त्यामुळे कांही वेळा मागणीपेक्षाही विपरीत अर्थ अर्जातून निघू शकतो. मूळ मागणीकडे अर्जदाराचे तसेच मंचाचे दुर्लक्ष होवू शकते, त्यामुळे माहिती अधिकारा अंतर्गत माहिती मिळविण्याचा हक्क ग्रहकाचा आहे व तो अबाधित आहे याबद्दल मंचास कांहीही म्हणणे नाही. तथापि मंच कार्यप्रणालीत प्रश्न विचारणे हे योग्य नसल्याने त्याचे तारतर्म ग्राहकाने वा प्रतिनिधींनी पाळणे आवश्यक आहे. या बाबी मंच मुद्दामपणे नमूद करीत आहे.

वि.प.ने मंचापुढे सुनावणीपूर्वी मुद्दे निहाय अभिपाय सर्व कागदपत्रांसह सादर करणे तसेच सुनावणीवेळी अधिक समर्थनार्थ माहिती देणे अगर कागदपत्रें दाखल करणे योग्य आहे, असे होणे उचित ही आहे. तथापि वि.पकडून अशी कृती केलेली दिसून येत नाही. संबंधित प्रकरणी मुद्देनिहाय अहवालात मंचाकडे माहिती असतांना वि.पकडून प्रश्न व उत्तर या स्वरुपात कागदपत्रांच्या पुराव्या विना नुसते लिखित सादर करणे हेही अयोग्य आहे.

तसेच आपले म्हणणे सादर करतांना तसेच कागदपत्रे दाखल करीत असतांना विनियमातील तरतुदींचे भान राखणे आवश्यक आहे व त्यासाठी वि.प.स अभिप्राय मागविणे व परत म्हणणे देणे अशी संधी विनियमात दिलेली आहे. याचा योग्य तो फायदा अगर वापर वि.प.कडून होत नाही असे मंचास खेदाने नमूद करावेसे वाटते. प्रस्तुत प्रकरणी दिलेला आदेश हा कागदपत्रांतील त्रुटी व चुकीच्या नोंदी यामुळेच द्यावा लागला आहे, याची नोंद वि.प.च्या संबंधितांना घेणे आवश्यक आहे व तयामुळेच आदेश पारित झाल्यानंतर सत्वर जागेची तपासणी करुन तशा संयुक्त तपासणी अहवालाप्रमाणे सर्व कागदपत्रांची पूर्तता ग्राहकाकडून करुन घेवूनच पुढील बील अदा करावे असे मंचाचे मत आहे. सबब अदेश पुढील प्रमाणे –

## आदेश

१) डिसेंबर २००७ पासून आज अखेर दिलेली ६ एचपीची बीले रद्द करुन ३ एचपी ापरावप्रामाणे बीले नव्याने अदा करवीत व त्यात वेळोवेळी जमा केलेल्या रकमेचे समायोजन करण्यात यावे. सदर बील देतांना दंड व व्याज याची आकारणी करु नये. निव्वळ ३ एचपी वापराचे बील देण्यात यावे.

२) तसेच दिलेले बील ग्राहकाने सत्वर भरणे आवश्यक आहे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : (जी. सी. लेले)
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष ..

श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव ..